# उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,जिल्हाधिकारी कार्यालय,नागपूर

**मुदतवाढ प्रकरण**

क्र./मं.अ./उजि.भुसं.१/कावि- 505 /२०२१
उपजिल्हाधिकारी (भुसंपादन -१) वि.पा.वि.म
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
दि. २९/०७/२०२१

**विषय :- भुसंपादन प्रकरण क्रमांक २/अ-६५/२०१८-१९ मौजा — आवरमारा (शेती) ता. कुही जि. नागपुर मध्ये प्रारूप निवाडयास मुदतवाढ**

भुसंपादन अधिनियम — २०१३ अन्वये कलम १९(१) ची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक २७ मे, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली असल्याने दिनांक २६ मे, २०२१ पावेतो अंतिम निवाडा करणे आवश्यक होता, परंतु कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द पुनर्वसन विभागीय पथक,नागपूर यांचेकडुन अंदाजित निवाडा निधी वेळेच्या आत प्राप्त न झाल्यामुळे कलम १९(१) ची अधिसुचना संपुष्ठात आलेली होती.

त्या अनुषंगाने संबंधीत संपादन संस्था यांचे विनंतीवरून उक्त प्रकरणामध्ये मा. जिल्हाधिकारी, नागपूर (समुचित शासन) यांनी दिनांक २९-०७-२०२१ रोजीचे मुदतवाढ टिपणीनुसार भुसंपादन प्रकरण क्रमांक २/अ-६५/२०१८-१९ मौजा—आवरमारा (शेती) ता. कुही जि. नागपुर मध्ये अंतिम निवाडयाकरीता २६ मे, २०२१ च्या पुढे बारा महिण्याकरीता मुदतवाढ दिलेली आहे.

(डॉ.शिवनंदा लंगडापुरे)
**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र.१)**
**वि.पा.वि.म., नागपूर**

**ठिकाण- नागपूर**
**दिनांक-२९-०७-२०२१**